# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०१/०४/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### मा. अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्याकडुन सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निरोप समारंभ

दिनांक ०१/०४/२०२४ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण) येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **"निरोप समारंभाच्या"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) पोलीस उपनिरीक्षक श्री. जगदीश बिरोले, डायल ११२ नागपूर ग्रामीण २) पोलीस उपनिरीक्षक श्री. विजयसिंग ठाकुर, पोलीस स्टेशन मौदा ३) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ईश्वर जोधे, पोलीस स्टेशन उमरेड ४) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जानराव बडवाईक पोलीस स्टेशन रामटेक ५) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. लक्ष्मीप्रसाद दुबे अर्जशाखा नागपूर ग्रामीण ६) चालक श्रेणी पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र कडु मोटार परीवहन विभाग नागपूर ग्रामीण ७) सहायक फौजदार श्री. दिलीप लोखंडे पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ८) सहायक फौजदार श्री. किशोरसिंह ठाकुर पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ९) सहायक फौजदार श्री. शंकर काकडे पोलीस स्टेशन खापरखेडा १०) पोलीस हवालदार श्री. केशव मुसळे नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीण यांना मा. अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. रमेश धुमाळ यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी अंमलदारांना मा. अपर पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल मा. अपर पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची प्रशंसा केली. सदर निरोप समारंभाचा कार्यक्रमास मा. अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. रमेश धुमाळ, मा. पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर कार्यालयातील इतर अधिकारी व अंमलदार स्टाफ हजर होता.

सदरचा कार्यक्रम मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. रमेश धुमाळ, मा. पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर यांनी घेतला तसेच मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी निवृत्त होणाऱ्या अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर